नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २०२ Issue - 202 | वार शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०२५ Blow- Friday Date 12 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# केंद्रीय कृषिमंत्र्यांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव

## खासदार ओमराजेंसह महाराष्ट्रातील २५ खासदारांच्या सह्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीबाबत राज्य सरकारची मोठी अनास्था असल्याचे प्रकरण समोर आलं आहे. राज्य सरकारने मदतीसाठी केंद्राला प्रस्तावच पाठवला नसल्याची माहिती पुढे आल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये अतिवृष्टी अनुदानावरुन खडाजंगी पाहायला मिळाली. विशेष म्हणजे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी २ डिसेंबर रोजी संसदेत लेखी उत्तरात माहिती दिली. सोबतच अतिवृष्टी झालेल्या क्षेत्राची माहिती देण्यातही राज्य सरकारची गंभीर चूक असल्याचे दिसून आले. १४ लाख हेक्टरवर नुकसान झालं असताना केंद्राला मात्र १.१० लाख हेक्टरचाच आकडा देण्यात आला. त्यावरुन आता खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. कृषीमंत्र्यांनी सभागृहात खोटी माहिती दिल्याचं ओमराजे यांनी म्हटलंय.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मदत एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मिळावी, यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्तावच पाठवला नाही. लोकसभेतील खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या तारांकित प्रश्नाला केंद्रीय कृषीमंत्र्यांनीच लेखी उत्तर दिलं. राज्यभरात अतिवृष्टीमुळे ७५.४२ लाख हेक्टर वरील पिकाचे नुकसान, तर ३५९८ घरांचे नुकसान झालं आहे. महापुराच्या विळख्यात २२४ लोकांचा मृत्यू, तर ५९९ जनावर मृत्युमुखी पडल्याची लेखी उत्तरात माहिती आहे. दरम्यान, केंद्र सरकारनेच स्पष्टपणे याबाबत माहिती दिली आहे. राज्य सरकारने प्रस्ताव वेळेत दिला असता तर तात्काळ मदत मिळण्यास मोठी मदत झाली असती, असे ओमराजे यांनी म्हटलं होतं. मात्र, राज्य सरकारने प्रस्ताव पाठवल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं. त्यावरुन, विरोधक आक्रमक झाले होते. त्यामुळे, राज्य सरकारच्या म्हणण्यानुसार कृषिमंत्र्यांनी सभागृहात खोटी माहिती दिल्याचा आरोप करत ओमराजे निंबाळकर यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.

महाराष्ट्राकडून शेतकऱ्यांना मदतीसाठी निधी मागणारा प्रस्ताव आला आहे, असे असत्य विधान केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केल्याचा आरोप करत ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभा अध्यक्षांकडे हक्क भंग दाखल केला आहे. या हक्कभंगाच्या प्रस्तावावर सुप्रिया सुळे, अरविंद सावंत, वर्षा गायकवाड, अनिल देसाई, प्रतिभा धानोरकर, बळवंत वानखडे, कल्याण काळे, संजय दिना पाटील, रवींद्र चव्हाण, अमर काळे, प्रशांत पडोळे, शामकुमार बर्वे, बजरंग सोनावणे, निलेश लंके, प्रणिती शिंदे, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, धैर्यशील मोहिते पाटील, शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे, अशा एकूण २५ महाविकास आघाडीच्या खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

अतिवृष्टीग्रस्तांच्या नुकसानीचा प्रस्ताव राज्याने केंद्राकडे पाठवलाच नसल्याचे केंद्र सरकारने लोकसभेत स्पष्ट केले, त्यावर आम्ही आवाज उठवला असता मुख्यमंत्र्यांनी लोकसभेतील प्रश्नोत्तरे ३०-३५ दिवस आधीच तयार केले जात असल्याचे सांगत विषय टाळण्याचा प्रयत्न केला होता.परंतु आज सभागृहात उपमुख्यमंत्र्यांनी मदतीच्या नुकसानीचा प्रस्ताव केंद्राकडे २७ नोव्हेंबरला पाठवल्याचे सत्य समोर आणत मुख्यमंत्र्याना त्यादिवशी खोटी ब्रीफिंग झाल्याचे सिद्ध केले, असे म्हणत आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांचा एक व्हिडिओ शेअर केला आहे.

## पुतीन यांच्या दौऱ्यानंतर अमेरिकेला जाग; ट्रम्प-मोदी यांच्यामध्ये कॉम्पॅक्ट लागू करण्यावर चर्चा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात फोनवर दीर्घ चर्चा झाली आहे. दोन्ही राष्ट्र प्रमुखांनी भारत-अमेरिका व्यापक जागतिक सामरिक भागीदारीच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रत्येक क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य मजबूत असल्याबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं. ट्रम्प यांच्यासोबत झालेल्या चर्चेची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया हँडलवरुन दिली आहे

डोनाल्ड ट्रम्प यांच्या सोबत झालेल्या चर्चेचा तपशील पंतप्रधान मोदींनी एक्सवर दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत उत्तम संवाद झाला. आम्ही द्विपक्षीय संबंधांच्या प्रगतीचा आढावा घेतला. आंतरराष्ट्रीय घटनाक्रमांवरही आम्ही चर्चा केली. भारत आणि अमेरिका जागतिक शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी सोबत येऊन काम करत राहतील, अशी ग्वाही मोदींनी दिली आहे.

द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी संयुक्त प्रयत्न कायम ठेवण्यावर दोन्ही नेत्यांचं एकमत झालं. COMPCT लागू करण्यासाठी क्रिटिकल टेक्नॉलॉजी, ऊर्जा, संरक्षण आणि सुरक्षेसह अन्य प्राधान्य क्षेत्रांमधील सहकार्य नव्या उंचीवर नेण्यासंदर्भात दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. प्रत्येक क्षेत्रातील सहकार्य, सहयोग सातत्यानं वाढत असल्याबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान बोलून दाखवलं.

पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष ट्रम्प यांच्यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध घटनांवरही चर्चा झाली. दोन्ही देशांसमोर असलेली आव्हानं एकत्रितपणे परतवून लावण्यासंदर्भात विचारांचं आदानप्रदान झालं. दोन्ही देश संयुक्त हितांसाठी काम करत राहतील. या प्रयत्नांना अधिक गती देण्यात येईल, असा निर्धार दोघांनी व्यक्त केला.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन गेल्याच आठवड्यात भारतात आले होते. त्यांचा भारत दौरा ३० तासांचा होता. रशियानं युक्रेनविरुद्ध युद्ध सुरु केल्यानंतरचा त्यांचा हा पहिलाच दौरा होता. या युद्धानंतर अमेरिकेनं रशियावर अनेक निर्बंध लादले आहेत. भारत रशियाकडून खनिज तेल खरेदी करत असल्यानं ट्रम्प यांनी भारतावर भरभक्कम टॅरिफ आणि दंड लावलेला आहे. यामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध ताणले गेले असताना पुतीन भारत दौऱ्यावर आले. यानंतर आठवड्याभरात मोदी-ट्रम्प यांच्यात पहिल्यांदाच फोनवरुन चर्चा झाली आहे.

## लोकआयुक्तांच्या चौकशी कक्षेत आता मुख्यमंत्रीही; महाराष्ट्र लोकआयुक्त सुधारणा विधेयक मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**






नागपूर: मुख्यमंत्री, मंत्री यांना लोकायुक्तांच्या कक्षेत आणणारे महाराष्ट्र लोकायुक्त सुधारणा विधेयक गुरुवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मंजूर करण्यात आले. या सुधारणेमुळे केंद्रीय कायद्याच्या माध्यमातून अस्तित्वात आलेल्या संस्थांवर राज्य सरकारने निवडलेले अधिकारीही लोकायुक्त कायद्याच्या कक्षेत येणार आहेत.

'डिसेंबर २०२२च्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक मंजूर झाल्यानंतर हे विधेयक पुढील मंजुरीसाठी राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आले होते. राष्ट्रपती भवनाने विधेयकात काही सुधारणा करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार सुधारणा विधेयक सादर करीत आहे,' असे फडणवीस यांनी सांगितले. 'हे विधेयक मंजूर केल्यानंतर पुन्हा राष्ट्रपतींकडे पाठवण्याची गरज नाही,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

फडणवीस यांनी या वेळी विधेयकात करण्यात आलेल्या सुधारणांची माहिती दिली. 'जुना महाराष्ट्र लोकायुक्त कायदा संपेल, तेव्हा जुन्या लोकायुक्तांचा पदावधीही संपणार आहे. त्यामुळे आपल्याला प्रथम नव्या लोकआयुक्त निवडीची प्रक्रिया सुरू करावी लागणार आहे. त्यानंतर महाराष्ट्र लोकायुक्त ही संस्था अस्तित्वात येईल. आधीच्या कायद्यात केंद्राच्या आयपीसी, सीआरपीएसी अशा जुन्या कायद्यांचा उल्लेख होता. हा उलेख काढून आता भारतीय दंड संहिता , फौजदारी प्रक्रिया संहिता आणि पुरावा कायदा या तीन कायद्यांचा समावेश करण्यात आला आहे,' असे फडणवीस यांनी नमूद केले. केंद्रीय कायद्याच्या माध्यमातून अस्तित्वात आलेल्या संस्थांवरील अधिकारी लोकायुक्तांच्या कक्षेत येणार की नाही, हा प्रश्न होता, परंतु अशा संस्थांवर अधिकारी निवडण्याचा अधिकार राज्य सरकारला असल्याने त्यांचा समावेश लोकआयुक्त कायद्यात करण्यात आला,' असे त्यांनी सांगितले. या वेळी त्यांनी महारेराचे उदाहरण दिले. मुख्यमंत्र्यांच्या खुलाशानंतर दोन्ही सभागृहांत चर्चा न होता हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले.

हजारे यांनी दिला उपोषणाचा इशारा

महाराष्ट्र लोकायुक्त सुधारणा विधेयक मंजूर करण्यापूर्वी 'लोकायुक्त कायद्याची तातडीने अंमलबजावणी करावी,' या मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला होता. राळेगणसिद्धी येथे ३० जानेवारी २०२६पासून उपोषण सुरू करणार असल्याचे त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्राद्वारे कळविले. हजारे यांनी केंद्रात लोकपाल आणि राज्यात लोकआयुक्त कायदा व्हावा, यासाठी मोठा पाठपुरावा केला होता.



## अखेर अण्णा हजारे उपोषण करणार, तारीखही ठरली; २ वर्षे होऊनही अंमलबजावणी नाही, मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र

अहिल्यानगर : नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात एकीकडे लोकायुक्त सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले असून दुसरीकडे याच कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंनी (पपर क्र्क्षरीश) पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत आणि लोकायुक्त कायद्यासाठी लढा उभारणाऱ्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले. या पत्रात लोकाआयुक्त विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी आपण उपोषण करणार (पान २ वर..)

### सहा राज्यांसाठी नवीन वेळापत्रक जाहीर

### मतदारयादीचा कच्चा मसुदा २३ डिसेंबरला होणार प्रसिद्ध

## निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय; 'एसआयआर'ला दिली मुदतवाढ






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: निवडणूक आयोगाकडून सहा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सध्या करण्यात येत असलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणीला (एसआयआर) गुरुवारी मुदतवाढ देण्यात आली.

निवडणूक आयोगाने तमिळनाडू, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, अंदमान-निकोबार बेटे आणि उत्तर प्रदेशसाठी सुधारित वेळापत्रक प्रसृत केले. ही सहा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील मतदारयादी तयार करण्याची प्रक्रिया मूळ नियोजनानुसार गुरुवारी संपणार होती आणि मतदारयादीचा कच्चा मसुदा १६ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होणार होता.

तमिळनाडू आणि गुजरातसाठी मतदारयादी तयार करण्याच्या प्रक्रियेची मुदत १४ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे आणि मतदारयादीचा कच्चा मसुदा १९ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल. मध्य प्रदेश, छत्तीसगड, अंदमान आणि निकोबार बेटांसाठी, मतदारयादी तयार करण्याची तारीख १८ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे आणि मतदारयादीचा कच्चा मसुदा २३ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल. उत्तर प्रदेशसाठी मतदारयादी तयार करण्याची प्रक्रिया २६ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे आणि मतदारयादीचा कच्चा मसुदा ३१ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल.

गोवा, पुद्दुचेरी, लक्षद्वीप, राजस्थान आणि पश्चिम बंगालसाठी मतदारयादी तयार करण्याची प्रक्रिया गुरुवारी संपेल आणि मतदारयादीचा कच्चा मसुदा १६ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल. केरळचे वेळापत्रक यापूर्वीच बदलण्यात आले होते. या राज्यासाठी मतदारयादी तयार करण्याची प्रक्रिया १८ डिसेंबर रोजी संपेल आणि मतदारयादीचा कच्चा मसुदा २३ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल.

कोणताही पात्र मतदार वळगला जाऊ नये, याची खात्री करण्यासाठी, नवीन मतदारांना फॉर्म ६ भरून विभागस्तरावरील अधिकाऱ्यांकडे (बीएलओ) सादर करण्यास किंवा पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये प्रकाशित होणाऱ्या अंतिम मतदारयादीत आपले नाव समाविष्ट करण्यासाठी ईसीआयनेट प किंवा वेबसाइट वापरून ऑनलाइन फॉर्म भरण्यास संधी दिली जात आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा 'धोकादायक' असून सध्या सुरू असलेल्या मतदारयादीच्या विशेष सखोल पडताळणी प्रक्रियेदरम्यान एकाही पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळल्यास आम्ही धरणे आंदोलन करू', असा इशारा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी दिला. नादिया जिल्ह्यातील कृष्णनगर येथे एका सभेत शहा यांच्यावर ममता यांनी टीकास्त्र सोडले. 'देशाचे गृहमंत्री धोकादायक आहेत. तुम्ही त्यांच्या डोळ्यांत ते पाहू शकता. ते भीतीदायक आहेत. त्यांच्या एका डोळ्यात तुम्हाला दुर्योधन दिसतो आणि दुसऱ्या डोळ्यात दुःशासन', असे त्या म्हणाल्या. २०२६च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी एसआयआरचा राजकीय शस्त्र म्हणून वापर केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

कोलकाता : कोलकात्यात अलीकडच झालेल्या गीता पठण कार्यक्रमात दोन खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर झालेल्या हल्ल्याचा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी कठोर शब्दांत निषेध केला. अशा प्रकारची धमकावणी राज्यात कधीच सहन केली जाणार नाही, असे त्या म्हणाल्या. 'यातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. हे पश्चिम बंगाल आहे, उत्तर प्रदेश नाही. त्यांनी मांसाहारी पदार्थ विक्रेत्यांना मारहाण केली... आम्ही सर्वांना काल रात्रीच अटक केली', असे बॅनर्जी यांनी नादिया जिल्ह्यातील कृष्णानगर येथील सभेत सांगितले. यावेळी त्यांनी भाजपवर राज्यात सांप्रदायिक फूट पाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. दरम्यान, कोलकाता पोलिसांनी दोन पदार्थ विक्रेत्यांवर झालेल्या मारहाणीप्रकरणी तिघांना अटक केली. मैदान पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या दोन तक्रारींवरून कारवाई करण्यात आली.

## संपादकीय....

### अविश्वास प्रस्ताव

राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीबाबत राज्य सरकारची मोठी अनास्था असल्याचे प्रकरण समोर आलं आहे. राज्य सरकारने मदतीसाठी केंद्राला प्रस्तावच पाठवला नसल्याची माहिती पुढे आल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये अतिवृष्टी अनुदानावरुन खडाजंगी पाहायला मिळाली. विशेष म्हणजे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी २ डिसेंबर रोजी संसदेत लेखी उत्तरात माहिती दिली. सोबतच अतिवृष्टी झालेल्या क्षेत्राची माहिती देण्यातही राज्य सरकारची गंभीर चूक असल्याचे दिसून आले. १४ लाख हेक्टरवर नुकसान झालं असताना केंद्राला मात्र १.१० लाख हेक्टरचाच आकडा देण्यात आला. त्यावरुन आता खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. कृषीमंत्र्यांनी सभागृहात खोटी माहिती दिल्याचं ओमराजे यांनी म्हटलंय. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मदत एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मिळावी, यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्तावच पाठवला नाही. लोकसभेतील खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या तारांकित प्रश्नाला केंद्रीय कृषीमंत्र्यांनीच लेखी उत्तर दिलं. राज्यभरात अतिवृष्टीमुळे ७५.४२ लाख हेक्टर वरील पिकाचे नुकसान, तर ३५९८ घरांचे नुकसान झालं आहे. महापुराच्या विळख्यात २२४ लोकांचा मृत्यू, तर ५९९ जनावर मृत्युमुखी पडल्याची लेखी उत्तरात माहिती आहे. दरम्यान, केंद्र सरकारनेच स्पष्टपणे याबाबत माहिती दिली आहे. राज्य सरकारने प्रस्ताव वेळेत दिला असता तर तात्काळ मदत मिळण्यास मोठी मदत झाली असती, असे ओमराजे यांनी म्हटलं होतं. मात्र, राज्य सरकारने प्रस्ताव पाठवल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं. त्यावरुन, विरोधक आक्रमक झाले होते. त्यामुळे, राज्य सरकारच्या म्हणण्यानुसार कृषिमंत्र्यांनी सभागृहात खोटी माहिती दिल्याचा आरोप करत ओमराजे निंबाळकर यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. महाराष्ट्राकडून शेतकऱ्यांना मदतीसाठी निधी मागणारा प्रस्ताव आला आहे, असे असत्य विधान केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केल्याचा आरोप करत ओम राजे निंबाळकर यांनी लोकसभा अध्यक्षांकडे हक्क भंग दाखल केला आहे. अतिवृष्टीग्रस्तांच्या नुकसानीचा प्रस्ताव राज्याने केंद्राकडे पाठवलाच नसल्याचे केंद्र सरकारने लोकसभेत स्पष्ट केले, त्यावर आम्ही आवाज उठवला असता मुख्यमंत्र्यांनी लोकसभेतील प्रश्नोत्तरे ३०-३५ दिवस आधीच तयार केले जात असल्याचे सांगत विषय टाळण्याचा प्रयत्न केला होता.

# बिनविरोध जागांचे श्रेय घेण्याचा शहाजीबापूंनी प्रयत्न करू नये : आमदार बाबासाहेब देशमुख

## भविष्यातही आमची आघाडी अभेद्यच राहणार; शहाजीबापूंनी आमची चिंता करू नये; बाबासाहेब देशमुख आणि दिपकआबा साळुंखे पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/तालुका प्रतिनिधी : सांगोला नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग १ अ मधून राणीताई आनंदा माने आणि प्रभाग ११ अ मधून सुजाताताई चेतनसिंह केदार सावंत यांची बिनविरोध निवड झाली. या दोन्ही बिनविरोध नगरसेविकांचे आघाडीच्या वतीने आम्ही अभिनंदन करतो. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मला, माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील, शिवसेनेचे शहाजीबापू पाटील, भाजपचे बाळासाहेब केदार, बाळासाहेब एरंडे यांसह सर्वांना विनंती केल्याने सांगोला शहर विकास आघाडीने समन्वयाची भूमिका घेतली त्यामुळेच या बिनविरोध निवडी शक्य झाल्या आहेत. त्यामुळे शहाजीबापू पाटील यांनी स्वतःची पाठ थोपटून या जागांचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये असा सज्जड इशारा सांगोला विधानसभेचे आमदार बाबासाहेब देशमुख आणि विधानपरिषदेचे माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिला.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपवून मी आणि माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील आम्ही सांगोला शहर विकास आघाडीतील नेतेमंडळींना एकत्रित घेऊन लवकरच सांगोला येथे सविस्तर पत्रकार परिषद घेऊन आमची भूमिका स्पष्ट करणार आहोत असेही यावेळी आजी माजी आमदारांनी स्पष्ट केले.

नगरपरिषद निवडणुकीच्या पूर्वीच जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगोला शहराच्या विकासासाठी सर्वांना एकत्रित येण्याची विनंती केले होती. यावेळी माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी पालकमंत्र्यांची विनंती धुडकावून लावली आणि निवडणूक प्रचारात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर युतीच्या सर्व मर्यादा सोडून एकेरी भाषेत टीका केली. आज तेच शहाजीबापू निवडणुकीचा निकाल जसा जवळ येऊ लागला तसतसे पालकमंत्र्यांचे गोडवे गात आहेत असेही आवर्जून आजी माजी आमदारांनी नमूद केले.

**१) शहाजीबापूंना भाजपचे वावडे का ?**

**मी स्वतः पुरोगामी विचारांच्या शेतकरी कामगार पक्षाचा आमदार असताना आणि दिपकआबा कोणत्याही राजकीय पक्षात नसताना आम्हाला आमची व्यक्तिगत भूमिका बाजूला ठेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या विनंतीला मान देऊन सांगोला शहराच्या विकासासाठी भाजपसोबत जाण्यासाठी तयार झालो मात्र शहाजीबापू पाटील हे पूर्वीपासून महायुतीत असूनही त्यांना भारतीय जनता पार्टीचे एवढे वावडे कशासाठी आहे ? आम्ही दोघांनी शहराचे हित पाहिले आमचा स्वार्थ बघितला नाही.मात्र बापूंनी भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मारुती आबा बनकर यांना टोकाचा विरोध करून स्वतःचा स्वार्थ बघितला असेही यावेळी आमदार बाबासाहेब देशमुख आणि माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी स्पष्ट केले.**

**२) शेकाप आणि दिपकआबा हातात हात घालून सोबत राहणार**

**शांत आणि सुसंस्कृत सांगोला तालुक्यात स्व गणपतराव देशमुख आणि दिपकआबा साळुंखे पाटील यांनी अनेक वर्षे विकासाचे राजकारण केले होते. तीच परंपरा यापुढील काळात सुरू ठेऊन येणाऱ्या काळात शेतकरी कामगार पक्ष आणि माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील हे एकदिलाने हातात हात घालून सांगोला शहर आणि तालुक्यातील राजकारणात सोबत राहणार आहोत आणि येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुका एकत्रित लढवणार आहोत असा विश्वास यावेळी नागपूर येथून आजी माजी आमदारांनी व्यक्त केला.**

सध्या दोन्ही आजी माजी आमदार हे सांगोला तालुक्यातील विकासाच्या प्रश्नावर हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे उपस्थित आहेत. बिनविरोध निवडीच्या पार्श्वभूमीवर बोलताना आजी माजी आमदार म्हणाले, आगामी काळातही सांगोला तालुक्यातील निवडणुकांच्या दृष्टीने आमची आघाडी अभेद्यच राहणार आहे. शहाजीबापूंनी आमची चिंता करू नये. आज शहाजीबापू पाटील ज्या निर्णयामुळे स्वतःची पाठ थोपटून घेत आहेत तोच निर्णय महिन्यापूर्वी त्यांनी घ्यायला हवा होता. सांगोला तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांवर सर्वांना एकत्रित येण्याची संधी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली होती. मात्र तेंव्हा त्यांना सांगोला तालुक्याची आणि शहराची नाही तर स्वतःची काळजी होती स्वतःच्या टक्केवारीचे दुकान सुरू ठेवण्यासाठी त्यांनी सांगोला शहरातील लोकांवर ही निवडणूक लादली. निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी ज्यांच्यावर आक्षेपार्ह भाषेत टीका केली आज त्यांचेच कौतुक ते करत आहेत सांगोला नगरपालिकेचा निकाल जसा जवळ येत आहे तसा शहाजीबापू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत आहेत. वेळ येईल तशी भूमिका बदलणाऱ्या शहाजीबापूंना आता सांगोला शहर आणि तालुक्यातील जनतेने चांगलेच ओळखले आहे आगामी सर्व निवडणुकात आमची आघाडी कायम राहणार आहे आणि या निवडणुकात तालुक्यातील जनता राजकीय रंग आणि भूमिका बदलणाऱ्या शहाजीबापूंना त्यांची जागा दाखवून देईल असा विश्वासही शेवटी आमदार बाबासाहेब देशमुख आणि माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केला.

## अखेर अण्णा हजारे उपोषण करणार, तारीखही ठरली; २ वर्षे होऊनही अंमलबजावणी नाही, मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र

(पान १ वरून...)

असल्याचे सांगत थेट उपोषणाची तारीखही जाहीर केली आहे. राज्य सरकाकडून लोकायुक्त कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पुन्हा एकदा अण्णा हजारे उपोषणाचे अस्त्र बाहेर काढणार असून आपण आमरण उपोषण करणार असल्याचं त्यांनी म्हटलं. ३० जानेवारी २०२६ पासून राळेगण सिद्धी येथील यादव बाबा मंदिरात ते उपोषण करणार आहेत.

महाराष्ट्र सराकरने २८ डिसेंबर २०२२ ला विधानसभेत आणि १५ डिसेंबर २०२३ ला विधानपरिषदेत लोकायुक्त विधेयक मंजूर केले आहे. मात्र, तब्बल २ वर्षे होऊन देखील या कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याने अण्णा हजारे उपोषण करणार आहेत. दरम्यान, लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी होत नसून सरकारची इच्छा दिसत नसल्याने उपोषणाला बसण्याची वेळ येत असल्याचंही अण्णांनी पत्रात म्हटलं आहे. दरम्यान, अण्णा हजारे यांनी २०११ मध्ये लोकायुक्त कायद्यासाठी मोठं जनआंदोलन उभारलं होतं, भ्रष्टाचारमुक्त भारताचा नारा देत अण्णांनी उभारलेल्या आंदोलनास देशभरात मोठा पाठिंबा मिळाला, त्यानंतर देशात आणि महाराष्ट्रातही सत्तापालट झाल्याचं पाहायला मिळालं.

तपोवनातील वृक्षतोडीवरही अण्णांची भूमिका स्पष्ट

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील तपोवन येथील वृक्षतोड केली जाणार आहे. वृक्षांमुळे मनुष्यच नाही तर वन्य प्राण्यांना देखील जीवदान मिळते. कुंभमेळा हा जरी समाजहिताचा आणि राष्ट्र हिताचा असला तरी त्यासाठी झाड तोडू नयेत. फारच आवश्यक असेल तर छोटी झाड तोडावेत. मात्र, मोठ्या झाडांना तोडू नये, अशी माझी विनंती असल्याचं अण्णा हजारे यांनी म्हटले आहे.

लोकायुक्त सुधारणा विधेयक समंत

विधान परिषदेत लोकायुक्त सुधारणा विधेयक बहुमताने संमत झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधान परिषदेत हे विधेयक मांडले आहेत. राष्ट्रपतींनी विधेयकाला मान्यता दिली आहे, त्यांनी काही सुधारणा सांगितल्या आहेत. लोकायुक्त निवडीबाबत एक सुधारणा आहे, भारतीय दंड संहितेचे बदललेले नाव ही अजून एक सुधारणा आहे. नव्या लोकायुक्त कायद्यानुसार मुख्यमंत्री देखील लोकयुक्ताच्या कक्षेत येणार आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधेयक समंत झाल्यानंतर बोलताना सांगितले.

## समग्र शिक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात पालघर जिल्ह्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाचा सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पालघर प्रतिनिधी/दिनेश घनघाव : दिनांक ११ डिसेंबर नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात पालघर जिल्ह्यातील समग्र शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारी ने सहभागी आहेत, त्या मध्ये पालघर जिल्ह्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचारीचा सहभागी आहेत.



महाराष्ट्र राज्यातील समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचारी गेल्या २० वर्षापासून नियमित सेवेमध्ये हक्कांसाठी लढा देत आहेत. शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत या कर्मचाऱ्यांनी ८ डिसेंबरपासून नागपूर येथे सुरू झालेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच बेमुदत उपोषण आणि आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात पालघर जिल्ह्यातील सर्व कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मधील कर्मचारी सहभागी झाले आहेत.

समग्र शिक्षा करार कर्मचारी संघर्ष समिती राज्यकृती समितीला पत्र दिले आहे. शासनाने स्वतःच्या सेवेत समाविष्ट करून नियमित करण्याचा ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी, अशी मागणीसुद्धा केली आहे. या आंदोलनात अन्नत्याग, घंटानाद, शंखनाद, थाळीनाद, टाळनाद मुक आंदोलन, भीक मागो आंदोलन, आत्मक्लेष आंदोलन असे अनेक मार्ग अवलंबले बाणार आहेत, आंदोलन सुरू झाल्याच्या सहाव्या दिवसांपासून कर्मचारी कुटुंबीयांसह या आंदोलनात उतरतील, असा इशारा समितीने दिला आहे. या आंदोलनात राज्यातील समग्र शिक्षेतील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांसह जिल्ह्यातील १०० टक्के कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले आहेत.

८ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार अनेक कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले परंतु उर्वरितांवर अन्याय झाला. पंजाब, सिक्कीम, मणिपूर या राज्यांनी समग्र शिक्षक कंत्राटी कर्मचारी नियमित केले आहेत. आसाम, मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्येदेखील आयोगानुसार बेतन दिले जाते. वेतन गेल्या चार वर्षांत जवळपास ५० टक्के कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त झाली आहे. २५७ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. मात्र मदत शुन्य मिळाली. सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना सरकारी मदत मिळाली नाही.

यामुळे कर्मचारी तणावात असून आंदोलनादरम्यान एखादी दुर्घटना घडल्यास त्याची पूर्ण जबाबदारी शासन आणि प्रशासनाची असेल, असा इशारा संघर्ष समितीने दिला आहे.

## स्वेरीमध्ये अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरसाठी नीति आयोगाबरोबर सामंजस्य करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या कॅम्पसमध्ये 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (एसीआयसी) स्थापन करण्याबाबत नीति आयोगासोबत सामंजस्य करार करण्यात आला.



स्वेरीचे माजी अध्यक्ष कै. दादासाहेब रोंगे यांचे नुकतेच निधन झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. स्वेरीचे संस्थापक व स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून एसीआयसी साठी नीति आयोग व इतर सहकाऱ्यांचे असलेले योगदान सांगून स्वेरीची स्थापनेपासूनची यशस्वी वाटचाल, संशोधन, तंत्रज्ञान यासाठी मिळालेला निधी, वसतिगृहे आदीबाबत सविस्तर माहिती दिली. यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एम. पवार यांनी स्वेरीची संशोधन संस्कृती, समाजासाठी व शेतकर्यांसाठी स्वेरीचे योगदान, तंत्रज्ञानातून समाजाचा विकास या बद्दल माहिती दिली. आयआयटी मध्ये शिक्षण पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या व्हील्स ग्लोबल फाउंडेशनच्या सुजाता नरसिंहन व महेश वैद्य यांनी आपल्या भाषणातून समाजासाठी योगदान देणे गरजेचे असून आपण आपल्या संस्थेच्या माध्यमातून बरेच सामाजिक कार्य करतो. पुढील वाटचालीसाठी आपण एकत्र येऊन अजून चांगले कार्य करू या.' असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना अटल इनोव्हेशन मिशनचे कार्यक्रम प्रमुख प्रतीक देशमुख म्हणाले की,'नीती आयोगाच्या माध्यमातून समाजातील समस्या सोडविण्यासाठी

**स्वेरी पंढरपूर हे अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर असणारे महाराष्ट्रातील पहिलेच केंद्र ठरणार आहे.**

इनोव्हेशन सेंटर स्थापीत केले जाणार आहे. याद्वारे आपण समाजातील समस्यांचे निराकरण करत राहू. यासाठी आपले उत्पादन, नवनवीन संकल्पना यांना येथे वाव दिला जाणार आहे. आपले उत्पादन हे समाजाच्या उन्नतीसाठी व फायद्यासाठी असेल. अशा उत्पादनाच्या निर्मितीला या केंद्राद्वारे प्रेरणा दिली जाईल.'

सदरचे केंद्र हे अटल इनोव्हेशन मिशन (एआयएम), नीति आयोग, भारत सरकार समर्थित आहे. यावेळी स्वेरी व एसीआयसी- स्वेरी पंढरपूर अराईज फौंडेशन यांचा नीति आयोग यांच्या बरोबर सामंजस्य करार करण्यात आला. 'नीति आयोग' ही भारत सरकारची धोरणांची आखणी व अंमलबजावणी करणारी प्रमुख संस्था आहे. या संस्थेद्वारे नवविचारांना प्रेरणा देणे, या नवीन आयडियांना मूर्त स्वरूप देण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य करणे आणि आर्थिक विकास करण्यासाठी नियम बनवत एक सशक्त भारत बनण्यासाठी योग्य दिशा देणे हा आहे. स्वेरीच्या माध्यमातून या केंद्राद्वारे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक सुविधा व विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. या केंद्राची निर्मिती ही संशोधन आणि विकासाचा एक भाग आहे. हे केंद्र विकसित भारत २०४७ च्या वाटचालीत सहाय्यभूत ठरेल. सदरचे केंद्र हे स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली आकारास येत आहे. यावेळी अटल इनोव्हेशन मिशनचे नावीन्यपूर्ण उपक्रम प्रमुख वितस्ता तिवारी, दीपाक्षी जिंदाल, गोपाळपुरचे सरपंच पांडुरंग देवमारे, पंढरपूरच्या प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्नेहा रोंगे, श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक सचिन पाटील, मोहन पाटील, सचिन वाघमारे, संभाजी शिंदे, सौ. नंदा मोरे, परिसरातील शेतकरी, महिला वर्ग, प्राध्यापक वर्ग तसेच स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष एस. टी. राऊत, सचिव डॉ. सूरज रोंगे, स्वेरीचे माजी अध्यक्ष आणि विश्वस्त एन.एम.पाटील, धनंजय सालविठ्ठल, एन.एस. कागदे, आर. बी. रिसवडकर, विश्वस्त एच.एम.बागल, बी.डी. रोंगे, विश्वस्त, पदाधिकारी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. हर्षवर्धन रोंगे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले तर सोबस इनसाईट फोरमचे संस्थापक दिग्विजय चौधरी यांनी विद्यार्थ्यांना नोकरीवर भर देण्यापेक्षा उद्योजक कसे होता येईल हे सांगून निर्मिती पासून ते मार्केटिंग पर्यंतचे टप्पे सांगितले आणि उपस्थितांचे आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आ. डॉ. बाबासाहेब देशमुखांची अधिवेशनात आग्रही मागणी

## म्हैसाळ योजनेतून सांगोला तालुक्यातील शेवटच्या गावांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करावा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला तालुक्यातील ८ गावे म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत येत असून सांगोला तालुक्याचा काही भाग म्हैसाळ योजनेच्या शेवटी येत असल्याने या गावांना या योजनेतून पाणी पुरवठा अतिशय कमी दाबाने होतो. परिणामी शेतकऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. याचा मोठा फटका तेथील शेतकऱ्यांना बसत आहे. पाण्याबाबतचा हा अतिशय महत्वाचा प्रश्न आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी नागपूर येथे विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मांडला. या गावांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी यावर उत्तर देताना लवकरच योग्य ती कार्यवाही करणार असल्याचे सांगितले.

सांगोला तालुक्यातील ८ गावे म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत येत असून सांगोला तालुक्याचा काही भाग म्हैसाळ योजनेच्या शेवटी येत असल्याने पाणी पुरवठा अतिशय कमी दाबाने होत असल्यामुळे शेतकऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. सांगोला तालुका हा राज्यातील कायम दुष्काळग्रस्त व पाणीटंचाईचा सामना करणारा तालुका असून येथे पर्जन्यमान कमी असल्याने शेती व पिण्याच्या पाण्यासाठी उपयुक्त स्त्रोतांचा नेहमीच अभाव जाणवतो. म्हैसाळ योजनेद्वारे कोरडा नदी व त्यावरील बंधारे भरून देण्याकरीता अंदाजित ३.०० दशलक्ष घनफूट पाण्याची आवश्यकता असून जत कालव्यातून पाणी बंदिस्त नालिकेद्वारे देण्याची तरतूद झाल्यास तेथील गावांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी व पशुधनासाठी लागणाऱ्या पाण्याची कमतरता नष्ट होऊ शकते, सदर योजनेतून कोरडा नदीवरील १५ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बंदिस्त पाईपलाईनद्वारे म्हैसाळ योजनेच्या जत कालव्यावरून पाणी देण्याची तरतूद करण्यात येणार आहे.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी या गावांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करण्यात येईल, असे सांगितले. आगलावेवाडी को.प.बंधाऱ्यापासून वाढेगावपर्यंत कोरड्या नाल्यातील एकूण १५ को.प. बंधाऱ्यामध्ये जत मुख्य कालव्यामधून थेट बंदिस्त नलिका वितरण करुन पाणी सोडण्याच्या प्राथमिक अहवालाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू असल्याचे सांगितले.

## पंढरपूरचे प्रसिध्द किर्तनकार ह.भ.प. मनोहर ठाकरे महाराज यांचे आळंदी येथे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चळे/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील प्रसिद्ध कीर्तनकार प्रवचनकार भागवत कथाकार व संतकृपा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक श्री ह भ प मनोहर गणपत ठाकरे( महाराज) यांचे आळंदी येथे ४ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर आळंदी येथेच अंत्यसस्कार करण्यात आले असून त्यांचा दशक्रिया विधी १३ डिसेंबर रोजी आळंदी येथे सकाळी आठ वाजता होणार असून त्यानिमित्त उत्तम महाराज बढे यांचे प्रवचन सेवा होणार आहे.

तेरावे विधी १६ डिसेंबर रोजी श्री विश्वधर्म प्रेम योगानंद गुरुकुल खंडोबा मंदिर आळंदी या ठिकाणी सकाळी आठ ते दहा या वेळेत होणार असून कीर्तन सेवा ह भ प श्री ज्ञानेश्वर महाराज कदम उर्फ (मोठे माऊली) हे सेवा बजावणार आहेत तर १४ वे विधी बुधवार दिनांक १७ डिसेंबर रोजी पंढरपूर येथील त्यांच्या अनिल नगर येथील मूळ निवासस्थानी होणार असून कीर्तन सेवा ह भ प श्री नामदेव महाराज लबडे (पंढरपूरकर) हे सेवा बजावणार आहेत वैकुंठवासी ह भ प मनोहर ठाकरे महाराज यांनी वारकरी संप्रदायाची आजन्म सेवा केली असून ते महाराष्ट्रातील एक नामवंत प्रवचनकार, कीर्तनकार, भागवत कथाकार म्हणून प्रसिद्ध त्यांनी आळंदी येथे मुलांसाठी वारकरी शिक्षण संस्था उभारली असून त्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी लाभ घेत आहेत त्यांच्या वैकुंठ गमनाबद्दल अध्यात्म, सामाजिक, शैक्षणीक क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे ते पंढरपूरचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ प्रशांत ठाकरे यांचे वडील होत. त्यांच्या पक्षात एक मुलगा मुलगी, जावई सुना, नातवंडे असा परिवार आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ६९ वर्षे होते.

# विद्या व विनम्र यांचे संगम म्हणजे रोहिणी उणदे : डॉ. जय सिद्धेश्वर महाराज




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : विद्या विनम्र असेल तर शोभून दिसतो विद्येची सर्वत्र पूजा केली जातो स्वदेशी पुजतो तो राजा विद्वान सर्वत्र पूजते. तेव्हा तुमच्या मुलांना पैसे संपत्ती कम वायला सांगू नका तर विद्वान बनायला सांगा. असे मत माजी खासदार शिवाचार्य रत्न ष. ब्र. डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी व्यक्त केले. कुमारी रोहिणी राजेंद्र उणदे हिने केंद्रीय लोकसेवा आयोग यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून भारतीय रेल्वे व्यवस्थापन सेवा मध्ये वर्ग एक पदी निवड झाल्याबद्दल सात डिसेंबर रोजी तिच्या मूळ गावी किरणळी तालुका अक्कलकोट येथे आयोजित भव्य नागरी सत्कार मध्ये बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की सध्या स्पर्धेचे युग आहे. रोहिणीने अतिशय अवघड परीक्षा उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. तिच्या यशाचे पाठीमागे तिच्या आई-वडिलांचेही खूप मोठे योगदान व त्याग आहे. असे मत व्यक्त केले. सर्वप्रथम रोहिणी राजेंद्र उणदे व त्यांची मातोश्री महादेव उणदे व राजेंद्र उणदे या तिघांचे भव्य नागरिक सत्कार किरणली ग्रामस्थ तर्फे डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामी यांच्या अमृत हस्ते व आनंद तानवडे, शेळके प्रशालाचे चेअरमन बसवराज शेळके, राजू रोडगेपाटील किरनळीचे सरपंच संगीता भंडारे राजेंद्र उणदे योगीराज बेळमगी शिवानंद बोरामणी यांच्या उपस्थितीत भव्य दिव्य असा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे यांनी भूषवला. कार्यक्रमाची प्रस्तावना दिया मल्लिनाथ उणदे यांनी केले, प्रस्तावना करताना ती म्हणाली की रोहिणी दीदींनी अतिशय परिश्रम व कष्ट करून यूपीएससी घवघवीत यश संपन्न केला आहे. मला तिचा खूप अभिमान व स्वाभिमान वाटत आहे. ती किरणळी सारख्या खेड्यात शिक्षण घेऊन आज अतिशय कठीण परीक्षा उत्तीर्ण होऊन यशाची शिखर गाठली आहे मलाही तिच्यासारखं यश संपादन करायचा आहे मला तिच्यापासून प्रेरणा मिळाली आहे व सर्वांनी ही प्रेरणा घेऊन जावी अशी मत व्यक्त केली. यावेळी केंद्रप्रमुख बापूराव चव्हाण, रोहिणीचे जिल्हा परिषद वर्ग शिक्षक नबी नदाफ इरणा आलूरे सर शशिकांत कोळी कल्लापा बिराजदार अप्पू सोनकांबळे सरपंच भंडारे,शशी कोळी या सर्वांनी मनोगत व्यक्त केले. मनोगत व्यक्त करताना रोहिणी उणदे म्हणाले की सर्व पालकांनी आपल्या मुलांना मोठी स्वप्ने दाखवा मुलांनी आपल्या आई वडिलांच्या व स्वतःच्या स्वप्नांसाठी कष्ट व परिश्रम करावे, अपयश आल्यास रडत नाही तर लढत राहावे यश आपलाच आहे. माझ्या या यशात माझ्या आई वडिलांचे आजोबा आजीचे व उणदे परिवाराचा फार मोठा योगदान व कष्ट आहे. विद्यार्थ्यांनी यूपीएससी एमपीएससी यासारख्या स्पर्धा परीक्षेसाठी प्रयत्न करावे माझ्याकडून शक्य होईल तेवढे मदत मी कधीही करण्यास तयार आहे अशी मत व्यक्त केली. त्यानंतर अध्यक्ष भाषणात तानवडे म्हणाले की रोहिणीच्या यशात त्यांच्या आई-वडिलांचे खूप मोठे त्याग व कष्ट आहे. तिला शिक्षणाबरोबर चांगले संस्कार ही त्यांनी तिच्यावर केले आहे संस्कार शिक्षण विद्या विनम्र या सर्वांचा संगम म्हणजेच रोहिणी असे मत व्यक्त केले




यावेळी गोगांव चे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, प्रदीप जगताप, सुनील सावंत, घोळसगाव सरपंच राजेंद्र किवडे, इराणा आलुरे, राजेंद्र कणमुसे, साहेबलाल सुभेदार, सचिन घुगरे, शिदोरे, तालुक्यातील ग्रामसेवक वर्ग व वागदरी परिसरातील अनेक गावातील सरपंच उपसरपंच मान्यवर उपस्थिती होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण भंडारे, शशी कोळी यांनी केले तर शंकर उणदे यांनी आभार मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मल्लू उणदे,शंकर गुमते, महेश कणमुसे इरप्पा हुलगणे यानी

# नागपूर हिवाळी अधिवेशनावर योग शिक्षकांनी काढला मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग : राज्यातील आरोग्यवर्धिनी योग शिक्षकांनी बुधवारी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी नागपुरातील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर मोर्चा काढला यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील योग शिक्षकांनी देखील सहभाग घेतला होता. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत यावर्षी योग शिक्षकांची पुनर्नियुक्ती न झाल्यामुळे योग शिक्षक बेरोजगार झाले . राज्य सरकारने अक्षरशः हजारो कुटुंबांची थट्टा केल्याचा आरोप करीत पुनर्नियुक्ती व थकीत मानधन मिळण्याची मागणी यावेळी मार्चेकऱ्यांनी लावून धरली.




संघाचे अध्यक्ष शरद बजाज, सचिव लता होलगरे व नैना झाडे यांच्या नेतृत्वात हा मोर्चा काढण्यात आला होता. बजाज यांनी सांगितले की, पुनर्नियुक्ती व थकीत मानधनाच्या प्रश्नावर

**सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, पंढरपूर, मोहोळ अशा सर्वच तालुक्यातील योगशिक्षक दत्तात्रय उंडाळ, सौ. अश्विनी उंडाळे, अशोक ननवरे, अनिल वेदपाठक, गौरी खेंडाड, किशोर परदेशी, साई रुद्रवरम, सौ दीपिका देशमुख, अक्षय बोबडे, प्रज्ञा काळे, अरुण जाधव , नागनाथ धोकटे, दयानंद माळी, अमोल करळे आदी आंदोलनस्थळी उपस्थित होते.**

यापूर्वी ८ जुलै रोजी यवतमाळसह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. त्यानंतर जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन आणि उपोषण करण्यात आले. मात्र, प्रशासनाने या आंदोलनांची साधी दखलही घेतली नाही. त्यामुळे राज्यभरातील योग शिक्षकांना एकजुटीने रस्त्यावर उतरणे भाग पडले.

**या आहेत मागण्या :**

- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत थांबलेली नियुक्ती प्रक्रिया त्वरित सुरू करा.
- थकीत मानधन त्वरित अदा करून, मानधनात वाढ करा.
- महाराष्ट्रातही योग आयोगाची तातडीने स्थापना करून योग शिक्षकांना रोजगार मिळवून द्या.
- योग शिक्षकांना केवळ मानधन तत्त्वावर न ठेवता, त्यांची 'एनएचएम'मध्ये नियमित नियुक्ती करा.
- आरोग्य विभागाच्या सल्लागार समित्यांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात एका योग शिक्षकाची नियुक्ती करा.



# पंढरपूरी म्हैस खरेदी साठी शेतकरी व गवळी समाजाला ५० टक्के अनुदान द्या

## शिवा संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपुर/प्रतीनीधी : आज नागपूर येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांना शिवा संघटनेचे वतीने निवेदन देण्यात आले महाराष्ट्रात अत्यंत देखणी असलेल्या पंढरपूरी म्हैशी असुन या म्हैसीचा संभाळकरणे अत्यंत जिकिरीचे झाले आहे वैरण व पशुखाद्या च्या महागाई मुळे शेतकरी व गवळी समाजाचे या म्हैसी पालना कडे दुर्लक्ष होत आहे विशेष करून गवळी समाज या म्हैसी सांभाळतो व जोपासना करतो परंतु खर्चीक असल्याने परवडत नाही त्यामुळे सरकार एकी कडे पंढरपूरी म्हैस जतन व्हावी यासाठी आपल्या सरकारचे पशुसंवर्धन खाते प्रोत्साहन देत असुन विविध उपाययोजना राबवत आहे या म्हैसी खरेदी साठी गोवा राज्य सरकार ५० टक्के अनुदान देत असुन याचं धर्तीवर गवळी समाजासह शेतकऱ्यांना पंढरपूरी म्हशी खरेदी करण्यासाठी ५० टक्के अनुदान द्यावे व म्हैस पाळण्यासाठी पशुखाद्य व वैरणीसाठी अनुदान द्यावे व म्हैसीच्या दुधाला १०० प्रती लिटर दर द्यावा असे निवेदन देताना शिवा संघटनेचे नेते राजु भिंगे, माऊली हळणवर, सचिन अंकुशराव,आमित साळुंखे बंडु चव्हाण विकास टाकणे आदी उपस्थित होते.

**दहाव्या धम्म परिषदेसाठी स्वागताध्यक्ष,अध्यक्ष व खजिनदारासह नूतन कार्यकारिणी जाहीर**

# तुगांव येथे दहाव्या अ.भा. बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड :

उमरगा तालुक्यातील तुगाव (जिल्हा धाराशिव) येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दि.२५ डिसेंबर २२५ रोजी अखिल भारतिय दहाव्या बौद्ध धम्म परिषदेचेआयोजन करण्यात आले आहे.

नियोजित धम्म परिषदेच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने नुकतच येथिल त्रिरत्न बुध्द विहारात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला तुगावमधील सर्व नागरिक,बंधूभगिनी,उपासक,उपासिका आणि मागील कार्यकारिणीतील सर्व सदस्यासह गावातील नागरिक, समता सैनिक दलाचे पदाधिकारी, महिला मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या.

दहाव्या धम्म परिषदे बाबत कांहीं नवीन : संकल्पना आणि सूचना संदर्भात चर्चा विचारविनिमय करून यावर्षीच्या नुतन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.

प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. लागलीच सामूहिक बुध्द वंदना झाली त्यानंतर या धम्म परिषदेचे मुख्या प्रवर्तक प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांनी प्रास्ताविकात आतापर्यंतच्या धम्म परिषदा, त्यामागील उद्देश व होणाऱ्या धम्म परिषदेसंदर्भात सविस्तर विवेचन केले.

यावेळी प्रमुख उपस्थितीत सौ.रेखाताई सुधाकर गायकवाड, संगीता नंदू गायकवाड, सौ.पार्वती गायकवाड, सौ. इंदुबाई भालेराव, अश्विनी नागटिळे, सौ. मंगल कांबळे, जितेंद्र कांबळे, बलभीम गायकवाड, सचिन बनसोडे, संकल्प कांबळे, भालचंद्र लोखंडे आदींची आवर्जून उपस्थिती होती.

गेली आठ नऊ वर्ष तुगाव येथील ग्रामस्थ अतिशय रचनात्मक पद्धतीने तुगाव आणि पंचक्रोशीत धम्माचा सुमंगल विचार मनोमन रुजविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. यावेळी बौध्द धम्मा संदर्भात अनेकांनी आपली मनोगते व्यक्त करून आपल्या आचरणातून धम्माची व्याप्ती अधिकाधिक वाढविण्याचा दृढ निश्चय केला.त्यामुळेच याही वर्षी ही यशस्वी परंपरा दृगोचर करण्यासाठी नूतन पदाधिकारी व नवीन कर्यकरणीची निवड करण्यात आली त्यात अध्यक्ष म्हणून शाहूराज भोसले तर खजिनदार म्हणून नंदकुमार गायकवाड यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. शेवटी आपण धम्म परिषदेच्या या उपक्रमशील कार्यरथाला सतत प्रोत्साहन देत अलात यापुढेही असेच सहकार्य करावे अशी विनंती उपासक दत्ताभाऊ कांबळे यांनी केली. आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले.बैठकीचे सूत्रसंचालन धर्मेंद्र कांबळे आणि राजकुमार कांबळे यांनी केले.राष्ट्रगितानंतर बैठकीची सांगता झाली.

या प्रसंगी निवडण्यात आलेली संपूर्ण नुतन कार्यकारिण पुढील प्रमाणे स्वागताध्यक्ष भालचंद्र लोखंडे, अध्यक्ष शाहुराज भोसले, सचिव तथा खजिनदार नंदकुमार गायकवाड, इतर कार्यकारणीतील सदस्य पुढील प्रमाणे सचिन बनसोडे राजकुमार कांबळे, संकल्प कांबळे, छाया बागडे, बलभीम गायकवाड,धर्मेंद्र कांबळे, सागर भोसले,गोपाळ सुरवसे, सुदर्शन कांबळे, अमृत कांबळे, विद्याचंद्र कांबळे, नीलकंठ (जॉन) कांबळे, दत्ताभाऊ कांबळे, धर्मा बनसोडे, विशाल कांबळे, लोकेश कांबळे, आकाश कांबळे, सुरज गायकवाड, सुधाकर गायकवाड, शिवाजी कांबळे,दिगंबर कांबळे कान्हा जाधव,



अजय कांबळे, बाळू गायकवाड, विलास गायकवाड, राज गायकवाड, ऋतिक भैय्या बनसोडे, धर्मेंद्र कांबळे, सुमित गायकवाड आधीची निवड करण्यात आली.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# 'व्हॉईस ऑफ मीडियाच्या आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद

## राज्यभरातून शेकडो पत्रकार, पदाधिकारी सहभागी; पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री प्रतिनिधीची भेट

## सरकारनी भूमिका घ्यावी तरच आंदोलन मागे : राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्यातील पत्रकार, डिजिटल माध्यमे, साप्ताहिक आणि रेडिओ या पत्रकार यांना भेडसावणाऱ्या गंभीर प्रश्नांबाबत 'व्हॉईस ऑफ मीडिया' 'VOM इंटरनॅशनल फोरम' च्या वतीने नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथील यशवंतराव चव्हाण स्टेटियमवर जोरदार आंदोलन, उप-ोषण सुरू करण्यात आले आहे. पत्रकार आणि पत्रकारितेशी संबंधित ३३ मागण्यांवर तातडीची कार्यवाही करण्याची मागणी येथे करण्यात आली आहे. राज्यभरातील पत्रकारांनी जोरदार सहभाग नोंदविल्यामुळे हे आंदोलन यशस्वी झाले आहे.




या ३३ मागण्यांमध्ये,पत्रकार महामंडळ तात्काळ कार्यान्वित करून किमान ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करावा. अनेक वर्षांपासून अडकलेल्या माध्यमांच्या शासकीय बिल तातडीने द्यावे. पाच वर्षांपासून दरवाढ न झाल्याने किमान २००% दरवाढ द्यावी. दैनिकांची २०२३-२०२४ पडताळणी व द्विवार्षिक पडताळणीवरील निर्णय १५ दिवसांत देऊन GR काढावा. सर्व विभागांची दोन वर्षांपासून थकीत बिले ३० दिवसांत देण्याचे आदेश द्यावेत. माहिती विभागाच्या नियमावलीचे उल्लंघन करून इतर मार्गाने दिल्या जाणाऱ्या जाहिरातींवर कडक कारवाई करावी. सध्याच्या काळात ६०% नी कमी झालेल्या शासकीय जाहिराती पुन्हा वाढवाव्यात. सर्व मान्यताप्राप्त माध्यम संस्थांसाठी पत्रकारांचे किमान मासिक मानधन शासनाने निश्चित करून सक्तीने अंमलात आणावे. पत्रकार सुरक्षा कायदा सक्षम करून तात्काळ FIR, जलद न्यायालये व संरक्षण यंत्रणा लागू करावी. जिल्हा व तालुका पातळीवर 'पत्रकार संरक्षण अधिकारी' नेमावेत. पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी १० लाख आरोग्य विमा व २५ लाख अपघात विमा लागू करावा. पत्रकारांसाठी स्वतंत्र निवृत्तीवेतन योजना सुरू करावी. सर्व गृहनिर्माण योजनांमध्ये पत्रकारांसाठी २% राखीव कोटा निश्चित करावा. जिल्हा प्रेस क्लबांना तांत्रिक सुविधा, इंटरनेट, प्रशिक्षणासाठी विशेष निधी द्यावा. जिल्हा माहिती कार्यालयांत 'मीडिया सपोर्ट सेल' स्थापन करावा. डिजिटल पत्रकारिता, तथ्य-जांच, कायदे व नवीन तंत्रज्ञानासाठी राज्यस्तरीय प्रशिक्षण अकादमी स्थापन करावी. डिजिटल न्यूज पोर्टल नोंदणी प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने तातडीने सुरू करावी. शासनविरोधी बातम्यांमुळे नोंदविलेले बिनबुडाचे गुन्हे मागे घेण्यासाठी स्वतंत्र समिती नेमावी. दुर्घटना, आपत्ती व आजारांमध्ये अडचणीत सापडलेल्या पत्रकारांसाठी तातडीचा मदत निधी निर्माण करावा. महिला पत्रकारांसाठी सुरक्षित प्रवास, निवास सुविधा, मातृत्व रजा, क्रेच व लैंगिक छळ प्रतिबंध यंत्रणा बळकट करावी. राज्य, जिल्हा व राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार सन्मान पुरस्कारांना आर्थिक स्वरूप देऊन 'पत्रकार गौरव योजना' सुरू करावी. जिल्हा माहिती अधिकारी व उपसंचालक पदे रिक्त असल्याने कामकाज ठप्प आहे; सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत. जाहिरात धोरणात नियमित साप्ताहिकांना अग्रक्रम द्यावा. जाचक अटी शिथिल करून साप्ताहिक नियतकालिकांची परंपरा टिकून रा-हील, याची व्यवस्था करावी. दैनिक व साप्ताहिक माध्यमांमधील भेदभाव दूर करून, दैनिकांप्रमाणेच साप्ताहिक प्रतिनिधींनाही शासन-प्रशासनात समान सन्मान द्यावा. न्यूज पोर्टल, यूट्यूब न्यूज चॅनेल व इतर डिजिटल प्लॅटफॉर्मना अधिकृत वृत्त माध्यमाचा दर्जा द्यावा. डिजिटल पत्रकारितेसाठी स्वतंत्र व पारदर्शक नियमावली तयार करावी. जाहिरात धोरणात डिजिटल माध्यमांसाठी स्वतंत्र प्राधान्य निश्चित करावे. रेडिओमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना शासनाकडून अधिस्वीकृती व मान्यता द्यावी. केंद्र सरकारप्रमाणे राज्य सरकारकडूनही रेडिओ माध्यमांना जाहिराती वाढवाव्यात. पत्रकारांना मिळणाऱ्या सुविधा रेडिओ कर्मचाऱ्यांनाही मिळाव्यात. आर जे (निवेदक) म्हणून काम करणाऱ्यांना मालकांप्रमाणे इतर सुविधा व अधिकार द्यावेत. रेडिओ कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पेन्शन योजना लागू करावी. अशा मागणीचा ही समावेश करण्यात आला आहे. आज पहिल्या दिवशी उपोषण ठिकाणी नागपूर पोलीस आयुक्त, रविंद्र सिंगल,अतिरिक्त आयुक्त नवीनचंद रेड्डी यासह अनेकांनी भेट दिली.

मुख्यमंत्री दूत ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष, आयुष्मान भारत-मिशन महाराष्ट्र समिती) यांनी आंदोलनास भेट देवून शिष्टमंडळाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणे करून दिले. पत्रकारांच्या अनुषंगाने ज्या काही मागण्या आहेत त्या मागण्या पूर्ण करण्यात येतील त्यासाठीच मुख्यमंत्री सन्माननिय देवेंद्र फडणवीस यांनी आपणास पाठवले आहे असे त्यांनी सांगितले. त्यांचेही भाषण झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दूत म्हणून आ. हेमंत पाटील आणि आ. बाबुराव कोहळीकर यांनी उपोषणास भेट दिली. त्यांनी ही वरिष्ठ पदाधिकारी किशोर कारंजेकर, दिलीप घोरमारे, राहुल सावजी यांचे बोलणे करून दिले. या सर्वांची यावेळी भाषणे झाली. संदीप काळे (संस्थापक व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व्हॉईस ऑफ मीडिया) म्हणाले की, सरकार वेळ काढून नेत आहे. सरकारने योग्य ती भूमिका घ्यावी तरच आम्ही आंदोलन मागे घेतो, अनेक मागण्या मान्य सह-तेने होवू शकतात पण सरकार करीत नाही.

अनिल म्हस्के (महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, व्हॉईस ऑफ मीडिया) यांनी राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष यांनी विनंती केली आहे की, त्यांनी सक्रियपणे आंदोलनात सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# बोरीवली गावात ईडी आणि एटीएसची संयुक्त धडक छापेमारी; दहशतवादी कृत्याशी संबंधित आर्थिक व्यवहार प्रकरणी मोठी कारवाई सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरीवली गावात रात्रीपासून ईडी आणि एटीएस यांनी संयुक्त छापेमारी गुरुवारी पहाटेच्या सुमारास सुरू केली आहे. दहशतवादी कृत्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या तपासाच्या अनुषंगाने बोरीवली गावातील अनेक निवासी घरांवर कारवाई करत छापेमारी केलीय. बोरीवली गावात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ईडी आणि एटीएस यांच्या ताफा बोरीवली गावात दाखल झाला असून डझनभर गाड्या गावात दाखल झाले असून तपास सुरू आहे. धक्कादायक बाब म्हणजे, भिवंडी तालुक्यातील बोरिवली गाव 'एनआयए'च्या रडारवर गेली २५ वर्षांपासून आहे.



ईडीच्या माहितीनुसार, फक्त भिवंडीतीलच नव्हे तर बोरीवली, पुणे, मालेगाव यांसह महाराष्ट्रातील सुमारे ४० ठिकाणी तसेच दिल्लीमध्येही ही सर्च ऑपरेशन मोहीम राबवली जात आहे. आयएसआय टेरर मॉड्यूलशी संबंधित संशयित आर्थिक हालचालींच्या तपासात ही कारवाई केली जात असल्याची माहिती समोर येत आहे. एन. आय ए.ने दाखल केलेल्या प्रकरणाच्या आधारे ईडीने अलीकडेच एउखठ नोंदवला असून, हा तपास साकिब नाचन प्रकरणाशी जोडला गेला आहे. २८ जून रोजी कारागृहात मृत्यू झालेल्या साकिब नाचनच्या दफनविधीनंतर एटीएसची ही पहिली मोठी हालचाल मानली जात आहे. एटीएस आणि ईडीने एक संयुक्त ऑपरेशनल ग्रिड तयार करून मिळालेल्या लीड्स व माहितीच्या आधारे तातडीने कारवाई केली आहे. या कारवाईमुळे बोरीवली गाव पुन्हा एकदा चर्चेत आला असून संपूर्ण बोरीवली गावाला पोलिसांच्या छावणीचे स्वरूप आले आहे. तसेच पुढील तपास सुरू आहे.

# मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत कवळी गाव अतिक्रमण मुक्त




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : कवळी गाव अतिकृमन मुक्त करण्यासाठी ग्रामपंचायत चा पुढाकार.

औसा तालुक्यातील कवळी येथे मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायतराज अंतर्गत कवळी गावातील अतिकृमन काडण्याचा ग्रामपंचायतने निर्णय घेतला व कवळी गावातील शासन जागेवर असलेले अतिकृमन जेसीबी च्या माध्यमातुन काडत गाव अतिकृमन मुक्त करण्याचा संकल्प केला व गावातील शासकीय जागेवर असलेले अतिकृमन काडण्यात आले ,कवळी गावच्या रणरागिणी सरपंच राहिबाई लहु जगताप यांनी मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायतराज अभियानातंर्गत गाव अतिकृमन मुक्ती चा संदेश देत प्रत्यक्षात जेसीबी लाउन गावातील गाव अंतर्गत जिल्हा परीषद शाळा ,मंदीर परीसर ,ग्रामपंचायत परीसरासह गावातील अनेक ठीकानचे अतिकृमन काडल्याने गावासह परीसरातुन कवळी ग्रामपंचायतच्या अतिकृमन मुक्ती निर्नयाचे स्वागत व अभिनंदन केले जात आहे

यावेळी अतिकृमन काडण्यासाठी कवळीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी सह महसुल अधिकारी ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्षा सह कवळी नागरीक उपस्थीतीत अतिकृमण मुक्त गाव करण्यात आले.

# वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल येथे शालेय विज्ञान, गणित प्रदर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल निफाड येथे गणित व विज्ञान प्रदर्शनाबरोबर इतर विषयांचे प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते ,यामध्ये विद्यार्थ्यांनी एकूण १८२ प्रतिकृतीचे सादरीकरण केले .यात इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांतवैज्ञानिकदृष्टिकोन जोपासला जावा,प्रात्यक्षिक प्रयोगाचे स्व अनुभव यावेत, याचबरोबर इतर विषयांमध्ये रुची निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले . होते विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सोलर बॅटरी, चंद्रयान ,एग्रीकल्चर बायोगॅस टेक्नॉलॉजी, सॅटॅलाइट, कार्बन पुरिफिकेशन, स्मार्ट ॲग्रीकल्चर ,वॉटर सेंसर, पक्षी निवारण तसेच मॅथ पार्क, जॉमेट्री पार्क अशा विविध साहित्यांची निर्मिती केली. याचबरोबर भाषेच्या व्याकरणावर आधारित विविध प्रतिकृती बनवल्या, तसेच चित्रकलेचे सुंदर चित्रांचे रेखाटन आकर्षण ठरले.

न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले, मधुकर राऊत, ड .दिलीप वाघवकर, विश्वासराव कराड यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले .

याप्रसंगी संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ व स्कूलच्या प्राचार्या पल्लवी सानप, वैनतेय विद्यालयाच्या माजी प्राचार्य मलती वाघावकर, प्राचार्य मनीषा गुजराथी आदी उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण विनोद परदेशी व पूजा सांगळे यांनी केले.

माजी नगरसेवक विक्रम रंधवे यांनी मॅथ पार्क बघून निफाड नगरीमध्ये मॅथ पार्क उभारण्याचे आश्वासनही दिले.

हे प्रदर्शन यशस्वी केल्याबद्दल सहभागी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व विश्वस्तांनी कौतुक केले.

**बावन्न ब्रास अवैध रेती साठा जप्त, आठ टिप्पर व एक जेसीबी जप्त**

**अवैध रेती वाहतूक व साठा करणाऱ्यांचे धाबे दणाणले**

# अमरावती विभागीय आयुक्त पथकाची डिग्रस बु येथे अवैध रेती साठ्यावर धाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : संपूर्ण जिल्हाभर अवैध रेती माफिया साठी प्रसिद्ध असलेले डिग्रस येथे अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पथकाने धाड टाकुनी मोठ्या प्रमाणात अवैध रेती साठा तसेच आठ टिप्पर व एक जेसीबी जप्त केल्याने डिग्रस बु येथील भरत संजय प-हाड,रविंद्र भास्कर लाड, धनंजय नारायण मिसाळ,उमेश आत्माराम प-हाड अशा चार अवैध रेती माफियांच्या चांगल्याच नांग्या ठेचल्या.

तालुक्यातील डिग्रस बु येथे खडकपुर्णा नदीचे पात्र असल्याने मोठ्या प्रमाणात या ठिकाणावरुन रेती माफिया दिवस-रात्र अवैध रेती उपसा करतात.यापुर्वी महसूल पथकाने अनेकदा या माफियांवर कारवाई चा बडगा उगारला पण पुष्पा स्टाईलने मैं झुकेगा नहीं या उक्तीप्रमाणे अवैध रेतीतुन गब्बर झालेले अवैध रेती माफियांच्या अमरावती विभागीय पथकाने चांगल्याच नांग्या ठेचल्या.या कारवाईत अंदाजे बावन्न ब्रास अवैध रेती साठा,आठ टिप्पर आणि एक जेसीबी जप्त करण्यात आलेले असुन जप्त करण्यात आलेली वाहने अंढेरा पोलिस स्टेशन ला आणण्याची कारवाई अंढेरा पोलिस स्टेशन ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या हजेरीत दुय्यम ठाणदार दिनेश घुगे आणि पोलिस कर्मचारी सुरू होती.





याबाबत सविस्तर वृत्त असे की, देऊळगाव महीचे महसूल मंडळ अधिकारी काशीनाथ भगवान इप्पर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंढेरा पोलिस स्टेशन ला दि.११डिसेंबर २०२५रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांचे पथकाने ग्राम डिग्रस बु येथे ११ डिसेंबरच्या सकाळी तीन ते चार वाजता मोठ्या प्रमाणात अवैध साठवून ठेवलेली रेती व रेती वाहतुक करण्यासाठी वापरता असलेले टिप्पर वाहनावर कार्यवाही केली असता आरोपी यांच्या ताबयातुन पंचनामा क्र.१ प्रमाणे डिग्रस बु येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याचे उत्तरेस गट क्र. ४५०मध्ये उमेश आत्माराम प-हाड रा. डिग्रस बु यांचे शेतातील जागेमधील घराशेजारी अंदाजे अवैध्द २५ ते ३० ब्रास रेती साठा किं.अं. १५००००/- रुपये दिसला. व तेथे एक जेसीबी किं. अं. ७०००००/- रुपये उभे असलेली व शेजारी टिप्पर क्र. १.चक २८ इ ६७३९ किं.अं. १२०००००/- २.चक १२ ठछ ३६६५ किं.अं. १२०००००/- ३. विना नंबर प्लेट असलेले किं. अं. १२०००००/- असे एकुण तिन टिप्पर व पंचनामा क्र. ०२ प्रमाणे धनंजय नारायण मिसाळ रा. डिग्रस बु यांचे स्वतःचे जागेमध्ये अवैध्द ०५ ते १० ब्रास रेती अंदाजे किं.५००००/- व १.एक अशोक लेलॅन्ड कंपनीचे चक २८ इइ ८१३९, किं. अं. १२०००००/- २. एक विना नंबरचे टाटा कंपनीचे टिप्पर किं. अं. १२०००००/- असे उभे असलेले मिळून आले. पंचनामा क्र. ०३ प्रमाणे रविंद्र भास्कर लाड रा. डिग्रस बु. यांचे घराजवळ अंदाजे १). ०५ ब्रास रेती साठा, किं. अं. २५०००/- रुपये ०२.) रेती साठाजवळ टिप्पर क्र.१. चक २८ इइ ३१९८, किं.अं. १२०००००/- २. चक २० एऋ ९२७७ किं.अं. १२०००००/- ३. पिवळ्या रंगाचे विना नंबरचे उभे असलेले टिप्पर किं. अं. १२०००००/- तसेच पंचनामा क्रमांक ०४. प्रमाणे भरत संजय प-हाड रा. डिग्रस बु. यांचे जागेत १० ते १२ ब्रास रेती साठा ६००००/- रुपयेचा असा एकुण १,०५,८५,०००/- रुपयेचा मुददेमाल मिळून आल्याने गुन्हा नोंद करण्यात आलेले आहे.घटनेचा पुढील तपास ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम ठाणेदार दिनेश घुगे करीत आहे.